**राज्य मानवी हक्क आयोग**

पोलीस कोठडी/न्यायालयीन कोठडीत तसेच निरनिराळया शासकीय संस्था यामध्ये मृत्यू पावलेल्या, बलात्कार झालेल्या प्रकरणाबाबतची माहिती पाठविणे.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन परिपत्रक क्र. एचआरसी.१३२००१/संकीर्ण/४५/पोल-१४

मंत्रालय, मुंबई ४०००३२,

दिनांक ४ सप्टेंबर २००२

वाचाः १) शासन परिपत्रक, गृह विभाग क्र. एचआरसी.१३२००१/संकीर्ण ४५/पोल-१४, दिनांक १७ एप्रिल २००१

२) शासन परिपत्रक, गृह विभाग, क्र. एचआरसी.१३२००१/संकीर्ण/४५/पोल-१४, दिनांक ४ जुलै २००१.

३) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचे पत्र क्र. एसएचआरसी.०८/ दिनांक १८ ऑगस्ट २००२

शासन परिपत्रक:- मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ मधील कलम २१ नुसार महाराष्ट्र राज्यात " महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग " स्थापन करण्यात आला असल्याने पोलीस कोठडी/ न्यायालयीन कोठडी तसेच निरनिराळया शासकीय संस्था यामध्ये मृत्यू पावलेल्या, बलात्कार झालेल्या प्रकरणाबाबतची माहिती २४ तासाच्या आत महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाला पाठविण्याबाबत शासन परिपत्रक, गृह विभाग क्र. एचआरसी. १३२००१/ संकीर्ण/ ४५/पोल-१४, दिनांक १७ एप्रिल २००१ तसेच दिनांक ४ जुलै २००१ अन्वये सर्व संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, असे असतांनाही असे अहवाल अद्यापही महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाला पाठविण्यात येत नाहीत असे निदर्शनास आले आहे. सबब सर्व संबंधित प्राधिका-यांना विशेषतः जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधिक्षक, पोलीस आयुक्त, कारागृह विभाग,

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
19 SEP 2002
शाखा
प्र. नि. नि. व. नि. जिल्हाधिकारी

कृ.मा.प.

जिल्हा दंडाधिकारी रत्नागिरी करिता

ज्युबेनाईल होम तसेच रिमांड होम यांना सूचित करण्यात येते की, याबाबतचे अहवाल त्यांनी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाला विहित मुदतीत सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ.ना.भोसले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

प्रति,

सचिव, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई,
महासंचालक व पोलीस माहानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व पोलीस आयुक्त,
पोलीस महानिरीक्षक ( मानवी हक्क), महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्रधान सचिव, समाजकल्याण, मंत्रालय, मुंबई
सचिव, बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व पोलीस अधिक्षक
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल